# महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम 2005

अधिनियम 2005 अंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना जालना जिल्ह्यात दिनांक 01/04/2008 रोजी रोजगार हमी योजना बंद करुन महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु करण्यात आली आहे.

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना राबविण्यासाठी जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हे जिल्हा कार्यक्रम समन्वयक अधिकारी म्हणून काम पाहतील व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे सहजिल्हा कार्यक्रम समन्वयक अधिकारी म्हणून काम पाहतील असे शासनाचे आदेश आहेत.

**अ) महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेखालील घ्यावयाची कामे**

1) **जलसंधारण व जलसंवर्धनाची कामे :-** यामध्ये मातीचे बांध, दगडी बांध, ढाळीचे बांध, कंपार्टमेंट बडींग, वनराई बंधारा, जैविक बांध, सलग समतल चर (C.C.T.), तुटक समतल चर, ट्रेच कम माऊड, सामुहिक शेततळे, मातीचे धरण, साठवण तलाव, पाझर तलाव, पाझर कालवे, गावतलाव, भूमीगत बंधारे, वन तलाव, बोडी नुतनीकरण इत्यादी.

2) **दुष्काळ प्रतिबंधक कामे :-** पडीक जमीनीवर वृक्षलागवड, रस्त्याच्या बाजूला वृक्षलागवड, रोपवाटीका, वृक्षलागवड, जाळ रेषांची कामे, बांभूरांझा भोवती वर्तुळाकार चर काढणे इत्यादी.

3) **जलसिंचन कालव्याची कामे :-** मातीचे कालवे, कालव्याचे नुतनीकरण.

4) **पारंपारिक पाणीसाठ्याचे नुतनीकरण करणे :-** तलावातील गाळ काढणे, जुन्या तलावाचे नुतनीकरण करणे, जुन्या वन तलावाचे नुतनीकरण करणे.

5) **पुर नियंत्रण व पुर संरक्षणाची कामे**

6) **ग्रामीण भागात बारमाही जोड रस्त्यांची कामे :-** जिल्हा रस्ता, गावरस्ते, गावातील अंतर्गत रस्ते, शेत रस्ते, स्मशानभूमी रस्ता, पाणी पुरवठा योजनेस जोडणारा रस्ता, रस्त्याचे नुतनीकरण, रस्त्याचे सरळीकरण इत्यादी.

ग्रामीण क्षेत्रातील कुंटूबांना कमीत कमी 100 दिवसाच्या रोजगाराची हमी देण्यासाठी "**केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम 2005**" या नावाने कायदा लागू केला. सुरुवातीला देशातील 200 जिल्हयात दि. 2 फेब्रुवारी 2006 पासून कायद्याची अंमलबजावणी करण्यात आली व दिनांक 01/04/2008

पासून उर्वरीत संपूर्ण जिल्ह्यात हा कायदा लागू करण्यात आल. जालना जिल्ह्यात हा कायदा दिनांक 01/04/2008 पासून लागू करुन ही योजना सुरु करण्यात आली.

1977 नुसार राबविण्यात जाणाऱ्या रोजगार हमी योजनेच्या धर्तीवर राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम राज्याच्या रोहयोमध्ये अंतर्गत नसलेल्या काही नवीन बाबीचा समावेश करण्यात आला आहे.

1) सर्व इच्छुक कुटूंबांना रोजगार पत्रिका फोटोसहित (जॉबकार्ड) ओळख पत्र देणे.

2) कामाची निवड, नियोजन व अंमलबजावणी यामध्ये ग्रामपंचायतीचा संपूर्ण सहभाग असणे.

3) नियोजनाच्या किमान 50% कामे ग्रामपंचायती मार्फत राबविणे.

4) संपूर्ण पारदर्शक राखणे.

5) सामाजिक अंकेक्षण करणे.

मग्रारोहयोच्या अंमलबजावणीसाठी व सनियंत्रणाकरिता पुढील अधिकाऱ्यांना त्याच्या समोर दिलेल्या पदनामानुसार घोषित करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) विभागीय आयुक्त | :- | ग्रामीण रोजगार हमी आयुक्त |
| 2) जिल्हाधिकारी | :- | जिल्हा कार्यक्रम समन्वयक |
| 3) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद | :- | सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक |
| 4) उपजिल्हाधिकारी (रोहयो) | :- | उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक |
| 5) उपविभागीय अधिकारी | :- | उपविभागीय कार्यक्रम समन्वयक |
| 6) तहसीलदार | :- | कार्यक्रम अधिकारी |
| 7) गटविकास अधिकारी | :- | सहगट कार्यक्रम अधिकारी |

ही योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी वेगवेगळया स्तरावरील अधिकारी (वरील प्रमाणे) यांनी कोणती कामे करावयाची आहेत. त्यानुसार ग्राम पातळी, तालुका पातळी, जिल्हा पातळी व आयुक्त पातळी आणि राज्य पातळी पर्यंत कामे विकसित करुन दिली आहे. ती खालीलप्रमाणे आहे.

1) **ग्रामपंचायतस्तर :-** कुटूंबांची / मजुरांची नोंदणी करणे , मजुरांची कामाची मागणी घेणे , कामे पुरविणे , ग्राम पंचयाती मार्फत करावयाच्या कामांचे अन्वेषण , सर्वेक्षण करुन अंदाजपत्रक तयार करणे कामाचे नियोजन करणे , कामाची अमलबजावणी करणे , मजुरांना मजुरी व कामासाठी निधी उपलब्ध करुन देणे , वेळेवर मजुरी वाटप करणे , जॉब कार्डवर नोंदी करणे तसेच सामाजीक

अंकेक्षणाद्वारे ग्राम पातळीवर व राज्यस्तरावर माहिती उपलब्ध करुन देणे हे ग्रामपंयचतीना अनिवार्य आहे.

2) **तालुका स्तर :-** तालुक्यातील शासकिय व जिल्हा परिषद यंत्रणा , ग्रामपंचायतींना कामाच्या नियोजनाबद्दल मार्गदर्शन करणे कामाचे नियोजन तयार करुन घेणे , पेमेंट अदायगी केलेले हजेरीपट व निधीचा हिशोब ठेवणे , राज्य व केंद्रशासनाला पाठवायची माहिती संकलित करणे व जिल्हास्तरावर पाठविणे.

3) **उपविभागीय स्तर :-** पंचयात समिती निहाय नियोजन करुन घेणे निधीचा हिशोब ठेवणे , केंद्रशासन व राज्यशासनाकडे आवश्यक ती माहिती पाठविणे , कामाचे सनियंत्रण करणे तसेच या योजनेची जिल्हयाचे प्रमुख या नात्याने जी काही कामे करवी लागतील ती सर्व कामे .

4) **आयुक्त स्तर :-** या योजनेच्या सर्व कामाचे समन्वयन, सनियंत्रण, पर्यवेक्षण, परिरक्षण, दक्षता व कामचे नियोजन विहित नियमा प्रमाणे वेळेत करुन घेणे.-

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत किमान 50% काम ग्राम पचांयती मार्फत करावयची आहेत. यांची संपूर्ण जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी याच्यांवर आहे. त्यांनी जिल्हा परिषद व पचांयत समितीकडे असणा-या सर्व तांत्रिक अधिकारी/कर्मचारी हे पूर्ण करुन त्यांच्याकडून कामे करुन घ्यावीत. (उदा. अन्वेषण, सर्वेक्षण, अंदाजपत्रके, तांत्रिक मान्यता व इतर)

50% कामे ही शासकीय यंत्रणामार्फत करावयाची आहे. ही कामे सद्याची राज्य रोजगार हमी योजनेमध्ये उपलब्ध असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्या मार्फत राबवायची आहे.

**मग्रारोहयो अंतर्गत घ्यावयाचा कामाचे नियोजनाची प्रक्रिया व वेळापत्रक.**

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत कामाचे नियोजन आर्थिक वर्षाप्रमाणे 1 एप्रिल ते 31 मार्च करावयाचे आहे. या कामाच्या आराखडयास आदल्या वर्षातील डिसेंबर पर्यंत जिल्हा परिषदे कडुन मंजुरी घेणे आवश्यक आहे.

नियोजन तयार करण्याचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

**1 जुलै ते 31 ऑगस्ट :-** ग्राम पंचायत पातळीवर व यंत्रणा मार्फत या योजने खाली कोणती कामे घ्यावयाची आहे हे तांत्रिक अधिकारी / कृषी अधिकाऱ्यांनी निश्चीत करणे.

**1 सप्टेंबर ते 15 सप्टेंबर :-** ग्राम पंचायतीने ग्राम सभा बोलावून अपेक्षीत मजुर उपस्थितीचा अंदाज घेवुन कामाची संख्या व कामाचे प्राधान्यक्रम ठरविणे.

**16 सप्टेंबर ते 30 सप्टेंबर :-** तालुका पातळीवर या कामाचे एकत्रिकरण दोन भागात करावे .

1) ग्राम पंचायत मार्फत करावयाची कामे (नियोजन ग्राम पंयाचत).

2) यंत्रणे मार्फत करावयाची कामे (नियोजन यंत्रणा)

या प्रमाणे कार्यक्रम अधिकाऱ्याने आराखडा करावा याची जवाबदारी उपविभागीय अधिकारी महसुल यांची राहील.

**1 ऑक्टोंबर ते 15 ऑक्टोंबर :-** पंचायत समितीपुढे कार्यक्रम अधिकारी तहसीलदार व गटविकास अधिकारी यांनी नियोजन आराखडा ग्रामपंचायत व नियोजन आराखडा इतर यंत्रणा सदर करणे व त्यास मान्यता प्राप्त करुन घेणे.

(याची जवाबदारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.)यांची राहील).

**16 ऑक्टोंबर ते 20 ऑक्टोबर :-** पंचायत समितीने तालुक्याचे नियोजन सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक (C.E.O.) यांचे कडे पाठवावे .

**21ऑक्टोंबर ते 31 ऑक्टोबर :-** सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांनी सर्व तालुक्याचे पंयाचत समितीने मान्य केलेले नियोजन जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी) यांच्याकडे पाठवावे.

**1 नोव्हेबर ते 14 नोव्हेबर :-** जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांनी सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक

यांच्या मदतीने नियोजन ग्रामपचायंत व नियोजन इतर यत्रंणा या दोन्ही नियोजनास जिल्हा परिषदेची मान्यता घ्यावी.

**15 नोव्हेबर ते 30 नोव्हेबर :-** जर जिल्हा परिषदेने विहीत वेळेत मान्यता न दिल्यास महात्मा गांधी रोजगार हमी योजना आयूक्त यांनी त्याच्या अधिकारात मान्यता द्यावी.

**1 डिसेंबर ते 15 डिसेंबर :-** कार्यक्रम अधिकाऱ्यांनी या मान्य झालेल्या तालुक्याच्या नियोजनाची एक प्रत ग्रामपंचायतीस पाठवावी.

## प्रशासकीय मान्यता देणे

1) वार्षिक नियोजन (Line Department) शासकीय यंत्रणेमार्फत तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकांना सक्षम अधिकारी तांत्रिक मान्यता देतील व जिल्हा कार्यक्रम समन्वयक हे मग्रारोहयो मधून प्रशासकीय मान्यता देतील.

2) वार्षिक नियोजन (ग्रामपंचायत) ग्रामपंचायत मार्फत तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकांना सहजिल्हा कार्यक्रम समन्वयक हे मग्रारोहयो अंतर्गत समक्ष अधिकाऱ्यांकडून तांत्रिक मंजूरी घेऊन ते प्रस्ताव जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांचेकडे प्रशासकीय मान्यतेसाठी पाठवतील.

अ) रु. 50 लाखापर्यंत अंदाजीत किंमत असणाऱ्या कामांना जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी) प्रशासकीय मान्यता देतील.

ब) रु. 50 लाख ते 65 लाखापर्यंत अंदाजपत्रकीय किंमत असणाऱ्या कामांना ग्रामीण रोजगार हमी आयुक्त प्रशासकीय मान्यता देतील.

क) रु. 65 लाखापेक्षा जास्त अंदाजपत्रकीय किंमत असणाऱ्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार शासनास राहतील.

**नोट :-** दि. 08 जून 2010 चे शासन निर्णयान्वये महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्याचे जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे असलेले सर्व अधिकार अनुक्रमे तहसीलदार आणि गटविकास अधिकारी यांना देण्यात आले आहेत.

मग्रारोहयो अंतर्गत ग्रामपंचायतीच्या कामाकरीता तांत्रिक मान्यता देण्याचे पूर्ण अधिकार पंचायत समितीच्या अभियंत्यास देण्यात येत आहे.

तसेच मग्रारोहयो अंतर्गत यंत्रणांच्या कामाकरीता तांत्रिक मान्यता देण्याचे पूर्ण अधिकारी संबंधीत खात्याचे तांत्रिक अधिकाऱ्यास (उदा. : अभियंता) देण्यात येत आहे.

**<u>मग्रारोहयो अंतर्गत कामाचे तपासणीचे मापदंड</u>**

शासन निर्णय क्र. मग्रारोहयो 2009/प्रक्र-94/मग्रारोहयो-10, दि. 14 ऑक्टोंबर 2009 अन्वये. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या मार्गदर्शक सुचनानुसार ग्रामपंचायत व यंत्रणेमार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्वच कामांचे

| | | |
|---|---|---|
| 1) तालुकास्तरावर | :- | 100 % तपासणी / दरमहा. |
| 2) जिल्हास्तरावर | :- | 10 % तपासणी / दरमहा. |
| 3) विभागीयस्तरावर | :- | 3 % तपासणी / दरमहा. |
| 4) राज्यस्तरावर | :- | 2 % तपासणी / दरमहा. |

करण्याचे या शासन निर्णयाद्वारे ठरविण्यात येत आहे.

-0-0-0-0-0-